17-05-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 5/17/2025 12:32 AM Page 1



'तो सामान्य खेळाडू म्हणून खेळू इच्छित नव्हता' पान ४ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड



आयपीएल २०२५ : ६ नवीन खेळाडूंची होणार एन्ट्री पान ४ वर

वेर्णा, शनिवार, १७ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 254 | Verna, | facebook.com/dainikherald | Saturday 17 May 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### जम्मू-कश्मीरमध्ये राजकीय तापमान पुन्हा वाढले

**श्रीनगर, दि. १६ :** जम्मू-कश्मीरमध्ये राजकीय तापमान पुन्हा एकदा वाढले आहे. सिंधु जल करारावरून जम्मू-कश्मीरचे मुख्यमंत्री, नॅशनल कॉन्फरन्सचे नेते उमर अब्दुल्ला आणि पीडीपीच्या नेत्या मेहबूबा मुफ्ती यांच्यात ट्विटरवर चांगलाच शाब्दिक वाद रंगला आहे.
दोघांनीही एकमेकांवर तीव्र आरोप करत, जुन्या राजकीय जखमा उकरून काढल्या आहेत.
वुलर तलावावरच्या टुलबुल नेव्हिगेशन बॅराज प्रकल्पावरून जम्मू-कश्मीरमध्ये राजकीय तापमान चांगलेच तापले आहे.
उमर अब्दुल्ला यांनी सिंधु जल कराराच्या स्थगितीचा दाखला देत हा प्रकल्प पुन्हा सुरू करावा, असे ठामपणे सांगितले. त्यांच्या मते, १९८०च्या दशकात पाकिस्तानच्या दबावामुळे थांबवलेला हा प्रकल्प आता नव्या जोमात सुरू केला जाऊ शकतो. यामुळे थंडीच्या काळात विजनिर्मिती वाढेल आणि काश्मिरी जनतेच्या हिताला चालना मिळेल. पण महबूबा मुफ्ती यांनी उमर यांच्या या प्रस्तावावर नाराजी व्यक्त करत ट्विट केले की, भारत-पाक तणावाच्या पार्श्वभूमीवर असा प्रस्ताव मांडणं दुर्दैवी आहे.
पाण्यासारख्या मूलभूत गोष्टीचं हत्यारीकरण करणं अमानवी आहे.

---

### बीएसएफ जवानाचा पाकिस्तानात छळ

**दिल्ली, दि. १६ :** पाकिस्तानमधून आलेल्या दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये हल्ला केला. यावेळी पर्यटकांना टार्गेट करत धर्म विचारून गोळ्या घातल्या. या घटनेने संपूर्ण देश हादरून गेला. लोकांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण बघायला मिळाले. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारताने या हल्ल्याचा बदला घेतला. फक्त हेच नाही तर या हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील संबंध ताणले गेले. यादरम्यानच्या घडामोडी सुरू असतानाच भारताचा बीएसएफ जवान चुकून पाकिस्तानमध्ये गेला. त्यानंतर अनेक घडामोडींनंतर १४ मे २०२५ रोजी पाकिस्तानने भारताचा जवान पूर्णम कुमार शॉला परत पाठवले.
पूर्णम कुमार हे चुकून आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून पाकिस्तानमध्ये गेले होते. त्यानंतर पाकिस्तान रेंजर्सनी त्यांना ताब्यात घेतले. यादरम्यान पाकिस्तानमध्ये आपल्यासोबत नेमके काय घडले हे पूर्णम कुमार शॉ यांनी सांगितले. ते दिवस किती जास्त भयानक होते, हे त्यांनी त्यांच्या पत्नीला सांगितले. जवान पूर्णम कुमार शॉ यांनी पत्नी रजनीला फोनवर बोलताना सांगितले की, पाकिस्तानमध्ये कैदेत असताना त्यांना झोपू दिले जात नव्हते.

---

### भारताने केला पाकिस्तानसोबतचा सिंधू जल करार रद्द

**नवी दिल्ली, दि. १६ :** पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानचे संबंध ताणले गेले. भारताने पाकिस्तानसोबतचा सिंधू जल करार रद्द केला. त्यामुळे पाकिस्तानला मोठा धक्का बसला. पाणी आणि रक्त एकाचवेळी वाहू शकत नाही, असं म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरकारचे इरादे स्पष्ट केले. दुसरीकडे ऑपरेशन सिंदूरनं हादरलेल्या पाकिस्ताननं भारताला सिंधू जल कराराबद्दल पुनर्विचार करण्याची विनंती केलेली आहे. ही विनंती भारतानं धुडकावली आहे. त्याउलट पाकिस्तानची आणखी कोंडी करण्याची तयारी भारतानं सुरु केली आहे.
भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि अफगाणिस्तानचे परराष्ट्रमंत्री अमीर मुत्ताकी यांच्यात १५ मेच्या संध्याकाळी फोनवरुन संवाद झाला. या फोननंतर पाकिस्तानात खळबळ उडाली आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर पुन्हा एकदा पाकिस्तान गॅसवर आहे. भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात झालेला संवाद पाकिस्तानच्या अडचणी वाढवणारा आहे.
पाकिस्तानसमोरील जल संकट अधिक गहिरं होण्याची शक्यता वाढली आहे.

# नळ कोरडे, टँकरवाचून पर्याय नाही

## नियोजनशून्य कारभाराचा सर्वसामान्यांना फटका | पाणी नाही

■ टीम दैनिक हेराल्ड :

**सासष्टी, दि. १६ : सासष्टी तालुक्यात पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण असून, रहिवाशांनी सरकारकडे तात्काळ कारवाईची मागणी केली आहे. राय, नावेली, बाणावली, कोलवा, नुवे, कुडतरी तसेच मडगाव शहरातील काही भाग गेल्या दोन आठवड्यांपासून अनियमित आणि अत्यल्प पाणीपुरवठ्यामुळे त्रस्त आहेत. परिणामी, अनेक कुटुंबे बाटलीबंद पाण्यावर अवलंबून राहत असून, त्यांचे दैनंदिन जीवन कोलमडले आहे.**



स्थानिकांच्या मते, दरवर्षी उन्हाळ्याच्या काळात निर्माण होणारे हे पाणी संकट आता गंभीर स्वरूप धारण करत आहे. नागरिकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राज्य सरकारवर दुर्लक्ष आणि नियोजनशून्य कारभाराचा आरोप केला आहे.

कोलवा येथील रहिवासी मिलाग्रेस फर्नांडिस म्हणाले की, वर्षानुवर्षे आम्ही या समस्येकडे लक्ष वेधत आलो आहोत, पण प्रशासनाची भूमिका उदासीन आहे. दर उन्हाळ्यात कोरडे नळ, अपूर्ण आश्वासने आणि असहाय्य जनता हेच चित्र दिसते. हे केवळ गैरसोयीचे प्रकरण नाही. आता हा माणसाच्या मूलभूत हक्कांचा प्रश्न झाला आहे.

नावेली मधील परिस्थिती आणखीनच बिकट असून, काही भागांमध्ये केवळ एक तासापुरता पाणीपुरवठा होत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा परिस्थितीत घर चालवणे अशक्य आहे. टँकरद्वारे पाणी खरेदी करताना आर्थिक भार वाढतोय आणि प्रशासनाकडून कोणतीही स्पष्ट माहिती दिली जात नाही, अशी प्रतिक्रिया रहिवासी अँथनी डायस यांनी दिली. २०२५ मध्ये देखील पाण्यासारख्या प्राथमिक गरजेसाठी झगडावे लागत असल्याचे दृश्य लज्जास्पद आहे, असेही ते म्हणाले.

या पाणीटंचाईचा फटका घरगुती वापरापुरता मर्यादित नसून स्थानिक लघुउद्योजक, रेस्टॉरंट्स, शाळा आणि क्लिनिक यांनाही जबर परिणाम सहन करावा लागत आहे. दररोजच्या कामकाजावर पाणीटंचाईचा थेट परिणाम होत असल्याची तक्रार अनेकांनी नोंदवली आहे.

गोगळ येथील गृहनिर्माण प्रकल्पातील युवा कार्यकर्ते रोहन नाईक यांनी प्रशासनाला कठोर शब्दांत इशारा दिला आहे. आम्ही पोकळ आश्वासनांना कंटाळलो आहोत. जर येत्या काही दिवसांत पीडब्ल्यूडी आणि राज्य सरकारने ठोस उपाययोजना केल्या नाहीत, तर साष्टी मधील नागरिक शांततापूर्ण आंदोलन सुरू करतील. पाणी ही चैन नाही, ती मूलभूत गरज आहे, असे ते म्हणाले. रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, वारंवार तक्रारी करूनही अधिकारी वेळेत प्रतिसाद देत नाहीत, तसेच पाण्याच्या दुरुस्ती आणि पुनर्संचयनाच्या कामांना स्पष्ट वेळापत्रक नाही. अनेकांनी जुनी आणि खराब झालेली पाइपलाईन, देखभालीचा अभाव आणि अकार्यक्षम नियोजन यालाच संकटाचे मुळ मानले आहे.

सध्या तापमान झपाट्याने वाढत असून, मान्सून सुरू होण्यास अजून काही आठवडे बाकी आहेत. अशा परिस्थितीत जलसंकट अधिक तीव्र होण्याची शक्यता असून, नागरिकांनी राज्य सरकारकडे ही समस्या सार्वजनिक आरोग्य आणीबाणी म्हणून घोषित करण्याची मागणी केली आहे.सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास, लोकक्षोभ उग्र रूप घेऊ शकतो, असा स्पष्ट इशारा आता नागरिकांकडून दिला जात आहे.

# 'स्ट्रीट प्रोव्हिडन्स'च्या निधीविषयी आश्वासन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १६ :** समाजसेवी संस्था 'स्ट्रीट प्रोव्हिडन्स'च्या प्रतिनिधींनी शुक्रवारी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांची अधिकृत निवासस्थानी भेट घेऊन संस्थेच्या कामकाजाशी संबंधित अडचणींबाबत चर्चा केली. या भेटीप्रसंगी संस्थेच्या संस्थापक ट्रस्टी डोनाल्ड फर्नांडिस यांनी मुख्यमंत्री यांच्याकडून लवकरच आर्थिक मदत मिळेल, असे आश्वासन मिळाल्याचे सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी स्वतः आम्हाला बैठकीसाठी बोलावले होते. त्यांनी आमच्या तक्रारी गांभीर्याने ऐकून घेतल्या असून, येत्या सात दिवसांत पुढील दोन महिन्यांसाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे, अशी माहिती फर्नांडिस यांनी दिली.

संस्थेचे स्वयंसेवक बॉस्को जॉर्ज यांनी सांगितले की, आतापर्यंत महिला आणि बालविकास विभागामार्फत निधी वितरित केला जात होता. मात्र, आता हा निधी समाजकल्याण विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. त्यामुळे काही प्रक्रियात्मक तपशील पूर्ण करणे आवश्यक असून, तोपर्यंत विद्यमान अर्थसंकल्पातून आगाऊ निधी दिला जावा, अशी शिफारस करण्यात आली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

फर्नांडिस यांनी यावेळी राज्यातील मानसिक आरोग्यविषयक सुविधांवरील गंभीर स्थितीकडेही मुख्यमंत्री सावंत यांचे लक्ष वेधले. गोव्यात कोणतेही अधिकृत आश्रयगृह उपलब्ध नाही. *इन्स्टिट्यूट ऑफ सायकियाट्री अँड ह्यूमन बिहेविअर मध्ये मुलांसाठी स्वतंत्र वॉर्ड नाही. गोवा पोलिस रस्त्यावर राहणाऱ्या लोकांना मदत करत नाहीत. शिवाय, राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात मानसिक रुग्णालये उपलब्ध नाहीत, असे त्यांनी सांगितले.

त्यांनी यावेळी स्पष्ट केले की, स्ट्रीट प्रोव्हिडन्स आता इतर राज्यांतील मानसिक आजारांनी त्रस्त व्यक्तींना गोव्यात आश्रय देणार नाही. यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी संबंधित राज्य सरकारांना पत्र पाठवून त्यांच्या नागरिकांची जबाबदारी घेण्याचे निर्देश देण्याचे आश्वासन दिले. आम्ही मुख्यमंत्र्यांसमोर एक प्रस्ताव मांडला आहे, की गावोगावी जाऊन अपंगत्वाची प्राथमिक लक्षणे असलेल्या लोकांना समजावून त्यांची नोंदणी केली जावी, जेणेकरून त्यांना वेळेवर मदत मिळू शकेल, असे फर्नांडिस यांनी सांगितले.

# कला अकादमीचे काम पुन्हा लांबणीवर

## ऑक्टोबरपर्यंत दुरुस्ती पूर्ण करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आश्वासन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १६ :** गोव्याच्या प्रतिष्ठेच्या कला अकादमीचा दुरुस्ती प्रकल्प आणखी दोन महिन्यांनी उशीर होणार आहे. हेराल्ड मिडियाने काम थांबल्याची बातमी दिल्यानंतर केवळ एका दिवसातच सरकारवर सर्वत्र टीकेची झोड उठली.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी शुक्रवारी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले की, कला अकादमी टास्क फोर्सने दाखवलेल्या त्रुटी कंत्राटदाराने अतिरिक्त खर्च न आकारता ऑक्टोबरपर्यंत दूर करायच्या आहेत. त्या कामानंतर करार रद्द केला जाईल आणि संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकले जाईल.ते पुढे म्हणाले की, मूळ करारात नसलेली अतिरिक्त कामे नव्या निविदेद्वारे करण्याचा सरकारचा मानस आहे.



दुरुस्तीतील विलंब आणि दर्जाबाबत सातत्याने प्रश्न उभे करत असलेल्या गोवा फॉरवर्ड पार्टीने (जीएफपी) तीव्र प्रतिक्रिया नोंदवली मुख्यमंत्रींनी स्वतःच कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याची कबुली दिली आहे. हा आमच्या जबाबदारीसाठी चालवलेल्या लढ्याचा विजय असला, तरी इतका निकृष्ट दर्जाचा कंत्राटदार निवडला तरी का? हे महत्त्वाचे प्रश्न अद्याप अनुत्तरितच आहेत.

जीएफपीने पूर्ण निविदा व अंमलबजावणी प्रक्रियेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकले जाणार असेल, तर तो उरलेले काम गुणवत्ता मुल्यांची तमा न बाळगता कसे पूर्ण करील? हे विधान गोंधळात टाकणारे आहे, असे कला राखण मंचचे सदस्य फ्रान्सिस कोएल्हो म्हणाले.

मंचाने आतापर्यंत तीन तपशीलवार अहवाल सरकारकडे सादर केले असून, आमचा पुढील अहवाल लवकरच मुख्यमंत्र्यांना देणार आहोत; टास्क फोर्स काम संपेपर्यंत सक्रीय राहील, अशी खात्री दिल्याने आम्हाला थोडे समाधान आहे, असे कोएल्हो यांनी स्पष्ट केले.राज्य सरकारच्या नोटिस घ्या , पुन्हा दुरुस्ती करा या भूमिकेमुळे नोकरशाहीची कार्यक्षमता, जबाबदारी आणि सार्वजनिक निधीचा वापर याबद्दल जनतेत नाराजी वाढली आहे. अनेकांनी या प्रकरणाला पद्धतशीर प्रशासनिक अपयशाचे प्रतीक ठरवले.

# शिरगाव खाण प्रकल्पाला स्थानिकांचा तीव्र विरोध

■ टीम दैनिक हेराल्ड

**शिरगाव, दि. १६ :** श्री लईराई देवी मंदिराच्या आवारापासून सरकारने निश्चित केलेल्या १५० मीटरच्या 'बफर झोन'चा ग्रामस्थांनी जोरदार निषेध केला असून खाण सीमेपासून शेवटच्या राहत्या घरापर्यंत किमान २०० मीटर संरक्षक क्षेत्र ठेवण्याची ठाम मागणी केली आहे.

सरकार आमच्या इच्छेला न जुमानता गावात बळजबरीने खाणकाम पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न करते आहे, असा गंभीर आरोप युवा विकास समितीचे कार्यकर्ते विजय गावकर यांनी केला. साळगावकर शिपिंग कंपनी प्रायव्हेट लिमिटेडसोबतच्या नवीन लीज करारावर प्रतिक्रिया देताना ते म्हणाले की, घर, शाळा, मंदिर व शेतीची मालमत्ता यांना खाण पट्ट्याबाहेर काढण्याची आमची

### ▶ २०० मीटर 'बफर' झोनची मागणी

मागणी दुर्लक्षित केली गेली. आता आम्ही हा निर्णय उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

गावकर यांनी 'निरी' च्या अहवालाचा दाखला देत सांगितले की, पूर्वीच्या उत्खननामुळे भूजल पुनर्भरण व्यवस्था धोक्यात आली आहे. खाण पुन्हा सुरू झाल्यास विहिरी, तलाव व झरे कोरडे पडून पाण्याचा तीव्र तुटवडा निर्माण होईल, असा इशारा त्यांनी दिला.

स्थानिकांनी साळगावकर शिपिंगच्या ब्लॉक २ आणि राजाराम बांदेकर मायनिंग प्रायव्हेट लिमिटेडच्या ब्लॉक ३ ला दिलेल्या पर्यावरणीय मंजुरीलाही न्यायालयात आव्हान दिले आहे. खाण व भूगर्भशास्त्र संचालनालयाने श्री लईराई मंदिरासाठी १५० मीटर तर धोंडाची तालीसाठी ८० मीटरचा 'बफर झोन' निश्चित केला आहे. तथापि, या मर्यादेमुळे गावातील घरे आणि शेती काही प्रमाणात खाण हद्दीत येत असल्याचा ग्रामस्थांचा आक्षेप आहे.

पर्यावरण कार्यकर्ते स्वप्नेश शेर्लेकर म्हणाले की, गोव्यातील सर्वाधिक पवित्र गावांपैकी एक असलेल्या शिरगावचा परिसंस्थात्मक विनाश योजनाबद्ध पद्धतीने झाला आहे. तीन वेगवेगळ्या लीजधारकांना एकाच छोट्या गावात उत्खननाची परवानगी देण्यात आली आहे, जणू इथे माणसं राहतच नाहीत.

लोककथेनुसार देवी लईराई आपल्या सहा भगिनीं-बंधूसह डीचोली क्षेत्रात स्थायिक झाली. आज गावात मूळ जंगल अवशेषही उरलेले नाहीत; भूगर्भातील पाण्याची पातळी पान २ ▶

# भारताच्या विमान वाहतूक सुरक्षेत वाढ

### ▶ विमान वाहतूक सुरक्षा ब्युरो ने गुरुवारी तुर्की विमानतळ ग्राउंड हँडलिंग कंपनी चेलेबी विमानतळ

**नवी दिली, दि. १६ :**



चेलेबी एअरपोर्ट सर्व्हिसेस इंडियाने निवेदनात म्हटले आहे की, हा रोखरच एक भारतीय उपक्रम आहे ज्याचे नेतृत्व आणि व्यवस्थापन भारतीय व्यावसायिक करतात आणि कोणत्याही मानकांनुसार ती तुर्कीची संस्था नाही.

तुर्कीने पाकिस्तानमध्ये भारताच्या हवाई हल्ल्यांचा निषेध केला आणि पाकिस्तानला पाठिंबा दिला तेव्हा भारताने हे पाऊल उचलले आहे. चेलेबी गेल्या १५ वर्षांपासून भारतातील ९ विमानतळांवर भारतीय विमान वाहतूक क्षेत्रात सेवा देत आहे.

नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू म्हणाले, राष्ट्रीय हित आणि सार्वजनिक सुरक्षा ही सर्वोपरि आहे आणि यावर कोणतीही तडजोड केली जाऊ शकत नाही.ब्युरो ऑफ सिव्हिल एव्हिएशन सिक्युरिटी (इउड) ने एका आदेशात म्हटले आहे की, राष्ट्रीय सुरक्षेच्या हितासाठी, चेलेबी एअरपोर्ट सर्व्हिसेस इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या संदर्भात सुरक्षा मंजुरी तात्काळ रद्द करण्यात येत आहे.

दरम्यान, दिल्ली विमानतळ ऑपरेटर (डायल) ने एका निवेदनात म्हटले आहे की त्यांनी इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर ग्राउंड हँडलिंग आणि कार्गो ऑपरेशन्ससाठी जबाबदार असलेल्या चेलेबीशी असलेले आपले संबंध अधिकृतपणे संपवले आहेत.दिल्ली विमानतळावरील ग्राउंड हँडलिंग आणि कार्गो टर्मिनल ऑपरेशन्स 'चेलेबी एअरपोर्ट सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि.' द्वारे व्यवस्थापित केले जात होते. लि.' आणि 'चेलेबी दिल्ली कार्गो टर्मिनल मॅनेजमेंट इंडिया प्रा. लि.' लि.'

२२ एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर हल्ला झाला ज्यामध्ये २६ लोकांचा मृत्यू झाला. यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला.

७ मे रोजी जेव्हा भारताने पाकिस्तानमध्ये हवाई हल्ले केले तेव्हा तुर्कीचे अध्यक्ष रेसेप तय्यिप एर्दोगान यांनी पाकिस्तानसोबत एकता व्यक्त केली. पण यानंतर, पाकिस्तानकडून झालेल्या प्रत्युत्तरादाखल, भारताने दावा केला की या संघर्षात तुर्की ड्रोनचाही मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला. ९ मे रोजी भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या पत्रकार परिषदेत कर्नल सोफिया कुरेशी म्हणाल्या, ड्रोनच्या ढिगाऱ्याची फॉरेन्सिक तपासणी केली जात आहे. प्राथमिक तपासात असे दिसून आले आहे की हे तुर्कीचे असिगार्ड सोंगर ड्रोन आहेत.

# डिचोली नगरपालिकेची थकबाकी ५ कोटींच्या घरात

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १६ :** डिचोली नगरपालिकेच्या कक्षेत येणाऱ्या व्यापाऱ्यांकडून सुमारे ५ कोटी रुपयांची थकबाकी वसूल करण्यात नगरपालिकेला अपयश आले असून, यामुळे महसूल गळती होत असल्याची तक्रार नगरसेवकांनी केली आहे. याशिवाय, खाणींशी संबंधित गाळ व्यवस्थापन व नियंत्रणामध्ये अपयश आल्यानंतर वेदांत खाण कंपनीकडून असहकाराची तक्रार पालिकेकडे दाखल करण्यात आली आहे.

ही माहिती सभापती विजयकुमार नाटेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत समोर आली. सुमारे साडेआठ तास चाललेल्या बैठकीत, पालिका प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर, कर्मचाऱ्यांच्या वर्तनावर तसेच बाजारपेठ व्यवस्थापनावर सखोल चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान, नगरसेवक दीपा शिरगावकर यांनी थकबाकी वसुलीबाबत चिंता व्यक्त करत स्पष्ट सांगितले की, ५ कोटी रुपयांहून अधिक थकबाकी वसूल करण्यात यंत्रणेला अपयश आले आहे. कर्मचारी या प्रकरणी ठोस उपाययोजना करत नसल्याचे दिसते. त्यांनी याबाबत डिचोलीचे आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांच्याशी चर्चा केली असून, त्यांनीही वसुलीतील विलंबाचा तपास करण्याचे आश्वासन दिले आहे.

बैठकीत अनेक नगरसेवकांनी पालिका कर्मचाऱ्यांच्या नागरिकांशी असलेल्या वर्तनावर नाराजी व्यक्त केली. ज्येष्ठ नागरिकांना कार्यालयात वारंवार चकरा माराव्या लागतात. काही कर्मचारी त्यांच्या अडचणी गांभीर्याने घेत नाहीत, अशी टीका शिरगावकर यांनी केली. नगरसेवक अनिकेत चाणेकर यांनीही सांगितले की, काही कर्मचारी योग्य कागदपत्रांची माहिती न देता नागरिकांची अडवणूक करतात.

बाजार समितीचे अध्यक्ष अनिकेत शिरोगणकर यांनी बाजारात सुरू असलेल्या विविध कामांबाबत समितीला विश्वासात घेतले जात नसल्याची तक्रार केली. यावर उपाय म्हणून, २२ मे रोजी विशेष बैठक बोलावण्याचा निर्णय घेण्यात आला, ज्यात बाजार क्षेत्रातील समस्यांवर चर्चा होणार आहे.

पालिकेने थकबाकी वसुली आणि दुकानांचे भाडेपट्टे नियमबाह्य पद्धतीने उपभोगणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचा ठराव बैठकीत मंजूर केला. अनेक दुकानांमध्ये मालकाच्या मृत्यूनंतरही त्यांच्या वारसांकडून भाडे वसूल न झाल्यामुळे महसुलात घट झाल्याचे समोर आले आहे. नगरसेवकांनी पालिकेकडून अशा दुकानदारांवर कठोर पावले उचलण्याची मागणी केली आहे, जे महानगरपालिकेची दुकाने पुढे सबलेट करत आहेत किंवा भाडे भरत नाहीत.